# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/01/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## दुखापत

१) पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा सेलु येथे दिनांक २४/०१/२०२३ चे ०९.३० वा. सुमारास यातील आरोपी नामे— १) लालु अजाबराव एकनाथ २) प्रेमलाल बोजरू एकनाथ, वय ६० वर्ष ३) रोहित चद्रशेखर एकनाथ सर्व रा. सेलु ता. कळमेश्वर हे फिर्यादी नामे— धनपाल प्रेमलाल वाळके, वय २८ वर्ष, रा. सेलु ता. कळमेश्वर याला शिविगाळ करत असताना फिर्यादीने हटकले असता तेव्हा आरोपीने हातात दगड घेवुन फिर्यादीचे डोक्यावर उजवे हातावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ३९७ कामडी मो. नं. ९९२३१२३३९७ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा सेलु येथे दिनांक २४/०१/२०२३ चे ०९.३० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— प्रेमलाल बोदरू एकनाथ, वय ६० वर्ष, रा. सेलु ता. कळमेश्वर यांचे चुलत भाऊ लालु अजाबराव एकनाथ व आरोपी नामे— धनपाल प्रेमलाल वाळके वय २८ वर्ष रा सेलु ता कळमेश्वर यांच्यात भांडण सुरू असता फिर्यादीने भांडण सोडविले व आपले चुलत भावाला घरी पाठविले त्यानंतर आरोपी याने फिर्यादीला शिविगाळ करून गोटा उचलुन फिर्यादीचे डावे डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ३९७ कामडी मो. नं. ९९२३१२३३९७ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. वेलतूर** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा पिपरी मुंजे येथे दिनांक २३/०१/२०२३ चे २३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– रशीया अश्वीन रामटेके, वय ३३ वर्ष, रा. पीपरी मुंजे, ता. कुही व आरोपी नामे– अश्वीन सोमाजी रामटेके, वय अंदाजे ३८ वर्ष, पिपरी मुंजे, ता. कुही हे पती पत्नी असुन नमुद घटनावेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही घरी हजर असतांना आरोपी हा दारु पिवून आला व फिर्यादी हिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला व तिच्या मुलींना शिवीगाळ करु लागला, यावरुन फिर्यादी हिने हटकले असता आरोपीने त्यांना शिवीगाळ करुन ढकलढूकल केले व मारण्याची धमकी दली, त्यामुळे फिर्यादी हिने म्हटले की, तुम्ही दारु पिवून आले तर मी तुमच्या घरातून निघून जाईन त्यावर आरोपी याने फ्रिजवर ठेवलेली कपडे कापण्याची कैची उचलून मारली ती कैची फिर्यादीच्या डाव्या पायाच्या मांडीवर लागून जखम झाल्याने त्यामधून रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. २१० संजय पायक मो. नं. ८८३०९२३३१० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**